नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४३ Issue - 43 | वार रविवार दि. २९ जून २०२५ Blow- Sunday Date 29 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com




# बापरे! शुभांशू शुक्ला यांचा अंतराळात २८ हजार किमी प्रतितास वेगाने प्रवास, एकाच दिवशी १६ सूर्योदय आणि सूर्यास्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात असलेले भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्याशी थेट संवाद साधला. १४० कोटी भारतीयांच्या वतीने त्यांनी शुभांशू यांचे अभिनंदन केले. तुम्ही आपल्या मातृभूमीपासून खूप दूर आहात, पण प्रत्येक भारतीयाच्या मनात तुमच्याबद्दल आदर आहे, असे पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. शुभांशू शुक्ला यांनीही पंतप्रधान मोदींचे मनःपूर्वक आभार मानले. पंतप्रधान मोदी यांच्या सक्षम नेतृत्वामुळेच मला हे स्वप्न साकार करण्याची संधी मिळाली, असे शुभांशू म्हणाले. पंतप्रधान मोदींनी शुभांशू यांच्या नावाचा उल्लेख करत त्यांच्या प्रवासाला 'एका नव्या युगाची सुरुवात' असे म्हटले.

मोदींनी केली तब्येतीची विचारपूस

मोदींनी शुभांशूंना त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच, त्यांच्या अनुभवांबद्दल जाणून घेतले. शुभांशूने सांगितले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वामुळेच त्यांना हे यश मिळाले. त्यांच्यामुळेच त्यांचे स्वप्न पूर्ण झाले. शुभांशू शुक्ला हे पहिले भारतीय आहेत, जे स्पेस स्टेशनवर गेले आहेत. त्यांनी यापूर्वी खडतर प्रशिक्षण घेतले आहे. या ऐतिहासिक कामगिरीमुळे देशातील तरुणांना प्रेरणा मिळत आहे.

'हा प्रवास फक्त माझा नाही'

पंतप्रधान मोदींनी शुभांशूंना विचारले, सर्वात आधी सांगा, तिथे सगळे ठीक आहे ना? तुमची तब्येत ठीक आहे ना? त्यावर शुभांशू शुक्ला म्हणाले, हो, पंतप्रधानजी. खूप खूप धन्यवाद. तुमच्या आणि १४० कोटी देशवासियांच्या शुभेच्छांसाठी धन्यवाद. तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादामुळे आणि प्रेमामुळे मी इथे अगदी ठीक आहे, सुरक्षित आहे. खूप छान वाटत आहे. हा अनुभव खूप नवीन आहे. पृथ्वीपासून ऑर्बिटपर्यंतचा म्हणजे ४०० किलोमीटरचा हा प्रवास फक्त माझा नाही. यात माझ्या देशाचाही सहभाग आहे. लहान असताना मी कधी विचारही केला नव्हता की मी अंतराळवीर बनेन. पण मला वाटते की तुमच्या नेतृत्वाखाली आजचा भारत ही संधी देतो. स्वप्न साकार करण्याची संधी देतो. माझ्यासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे. मला इथे खूप अभिमान वाटत आहे की मी इथे माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करत आहे.

'गाजरचा हलवा खाल्ला की नाही?'

शुभांशू, तुम्ही दूर अंतराळात आहात. जिथे ग्रॅविटी म्हणजे गुरुत्वाकर्षण नगण्य आहे. प्रत्येक भारतीय पाहत आहे की तुम्ही किती 'डाउन टू अर्थ' आहात. तुम्ही जो गाजरचा हलवा घेऊन गेला आहात, तो तुम्ही तुमच्या सहकाऱ्यांसोबत खाल्ला की नाही?. त्यावर शुभांशू यांनी उत्तर दिले की, मी गाजरचा हलवा, मूग डाळ हलवा आणि आमरस घेऊन गेलो होतो. सगळ्या सहकाऱ्यांनी त्याचा स्वाद घेतला. सगळ्यांना तो खूप आवडला.

२८ हजार किलोमीटर प्रतीतास वेगाने प्रवास

परिक्रमा करणे ही भारताची जुनी परंपरा आहे. तुम्हाला तर पृथ्वी मातेची परिक्रमा करण्याचे भाग्य मिळाले आहे. तुम्ही सध्या पृथ्वीच्या कोणत्या भागावरून जात असाल?, असा प्रश्न मोदींनी विचारला. त्यावर शुभांशू म्हणाले, थोड्या वेळापूर्वी मी खिडकीतून बाहेर पाहत होतो. तेव्हा आम्ही हवाईवरून जात होतो. आम्ही दिवसातून १६ वेळा परिक्रमा करतो. आम्हाला १६ सूर्योदय आणि सूर्यास्त दिसतात. ही खूपच आश्चर्यकारक प्रक्रिया आहे. या परिक्रमेत आम्ही जवळपास २८ हजार किलोमीटर प्रतीतास वेगाने प्रवास करत आहोत. तुमच्याशी बोलताना आम्हाला या वेगाची जाणीव होत नाही. कारण आम्ही आतमध्ये आहोत. पण कुठेतरी हा वेग आपल्याला दाखवतो की आपला देश किती वेगाने पुढे जात आहे. आम्ही इथे पोहोचलो आहोत आणि इथून पुढेही जायचे आहे.

'भारत खूप भव्य आणि मोठा दिसतो'

मोदींनी विचारले, अंतराळाची विशालता पाहून तुमच्या मनात पहिला विचार काय आला? त्यावर शुभांशू यांनी सांगितले, पहिला विचार पृथ्वीबद्दल आला. जेव्हा आम्ही पहिल्यांदा ऑर्बिटमध्ये पोहोचलो, तेव्हा पृथ्वीचे दृश्य दिसले. त्यावेळी मनात आले की पृथ्वी पूर्णपणे एक दिसते. कोणतीही बॉर्डर दिसत नाही. दुसरी गोष्ट जी मी पाहिली ती म्हणजे अंतराळातून भारताला पाहताना, नकाशात आपण आपल्या देशाला जसा पाहतो, तो तसा नाही. भारत खूप भव्य आणि मोठा दिसतो. नकाशापेक्षा खूप मोठा दिसतो. इथे आम्हाला जाणवतं की कोणतीही सीमा नाही, कोणताही देश नाही. आपण सगळे मानवतेचा भाग आहोत. पृथ्वी हे आपले घर आहे आणि आपण सगळे त्याचे भाग आहोत.

शुभांशू यांना अंतराळात काय अडचणी येतात?

पंतप्रधान मोदी म्हणाले, शुभांशू, तुम्ही स्पेस स्टेशनवर जाणारे पहिले भारतीय आहात. तुम्ही खूप मेहनत केली आहे. खूप ट्रेनिंग घेतली आहे. आता तुम्ही खऱ्या परिस्थितीत आहात. खरंच अंतराळात आहात. तिथली परिस्थिती किती वेगळी आहे? तुम्ही कसे जुळवून घेत आहात? त्यावर शुभांशू यांनी उत्तर दिलं.

इथे सगळे काही वेगळे आहे. मी मागील एक वर्ष ट्रेनिंग घेतली. मला सगळ्या सिस्टीम आणि प्रोसेस माहीत होत्या. मला एक्सपेरिमेंट्सबद्दल म्हणजे प्रयोगांबद्दल माहीत होते. पण इथे येताच सगळे काही बदलले. आपल्या शरीराला गुरुत्वाकर्षणात राहायची सवय असते. त्यामुळे सगळ्या गोष्टी त्याच हिशोबाने (पान २ वर...)

# दहशतवादी कृत्यांत सहभागी असलेल्या साकीब नाचणचा उपचारादरम्यान मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : दहशतवादी कृत्यांत सहभागी असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा बोरिवली गावात रहाणाऱ्या साकीब नाचण चा दिल्लीच्या तिहार जेल मध्ये शिक्षा भोगत असतानाचं त्याला ब्रेन स्ट्रोक होऊन चार दिवसांच्या उपपचारांनंतर त्याचा मृत्यू झाल्याची बातमी पडघा बोरिवली गावात येऊन धडकताच या ठिकाणी पोलिसांनी बंदोबस्त मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आल्याची माहिती पडघा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी दिली आहे

मृतक साकीब नाचण याला यापूर्वीच बंदी असलेल्या 'सिमी' संघटनेशी संबंधित असताना २७ जानेवारी २००३ सीएसटीहून कर्जतकडे जाणाऱ्या लोकल तसेच विलेपार्ले मार्केटमध्ये झालेले बॉम्बस्फोट आणि ६ डिसेंबर २००२ रोजी मुंबई सेंट्रल रेल्वेच्या इमारतीतील रेस्टॉरंटमध्ये एकूण तीन बॉम्बस्फोट केल्याच्या आरोपाखाली न्यायालयाने दोषी ठरवले



होते. त्यावेळी साखळी बॉम्बस्फोटांत १२ जणांचा मृत्यू झाला होता. या साखळी बॉम्बस्फोटांत एकूण १३ आरोपींपैकी १० आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवले होते. त्यामध्ये साकीबचा समावेश होता. साखळी बॉम्बस्फोटांची शिक्षा भोगून कारगृहात सुटका झाल्यानंतर ९ डिसेंबर २०२३ रोजी दिल्ली येथील एन एन आय पथकाने साकिब नाचण सह गावातील १५ संशयित दहशदवादीना ताब्यात घेऊन अटक केलं होती तर आधी याच गावातून पुणे येथील दहशतवादी मॉड्यूलर मधील तिघाजनांसह साकिब नाचण याचा मुलगा आकिब यास ताब्यात घेत कारवाई केली होती.

कारागृहात शिक्षा भोगल्यानंतर २०१७ मध्ये साबिकच्या सुटकेनंतर पडघा – बोरीवली गावात साकीबचे जंगी स्वागत झाले होते. विशेष म्हणजे साबिकच्या अटकेवेळी गावातील काही ग्रामस्थांनी पोलिसांसह एनआयएच्या पथकाला अडविण्याचा आणि हल्लयाचा प्रकार झाला होता. त्यामुळे तेव्हापासून एनआयए पथक आणि पोलीस या गावात प्रवेश करताना अधिक सर्तक आणि सावध असल्यानेच पडघा बोरीवली गावातुन साबिकच्या सुटकेनंतर आतापर्यत अनेक वेळा या गावात छापेमारी होऊन देशविरोधात कट कारस्थान रचल्याचे पुरावे केंदीय सुरक्षा यंत्रणांच्या हाती लागले आहे

धक्कादायक बाब म्हणजे दोन वर्षांपूर्वीच सीरिया या दहशदवादी संघटनच्या साथीनं पडघा बोरिवली गावाचं नाव अलशान ठेवण्यात आलं होत या गावाच्या जंगल भागात दहशतवादी तरुणांना ट्रेनींग देत असल्याचेही त्यावेळी एनआयएच्या पथकाने छापेमारी वेळी समोर आले होते.

# रॉच्या प्रमुखपदी पराग जैन!





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : काही दिवसांपूर्वी भारत-पाकिस्तान संबंध ताणले गेले होते. या काळात भारताने पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला उत्तर देण्यासाठी पाकिस्तानातील दहशतवाद्यांची अड्डे उद्धवस्त केली होती. यानंतर पाकिस्तानने भारतावर ड्रोन हल्ले केले. त्यालाही भारताने प्रत्युत्तर दिलं. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' मोहीमेतून पाकिस्तान विरोधात ही कारवाई केली होती. या कारवाईत मोलाचं कार्य करणारे ज्येष्ठ आयपीएस अधिकारी पराग जैन यांना केंद्राने आणखी मोठी जबाबदारी दिली आहे. पराग जैन यांची 'रॉ'च्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पराग जैन हे पंजाब कॅडरचे १९८९ चे आयपीएस अधिकारी आहेत. केंद्र सरकारकडून त्यांची रिसर्च अँड ॲनालिसिस अर्थात रॉच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पराग जैन यांचा आता कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. ते १ जुलै २०२५ पासून कार्यरत होतील. 'रॉ'चे सध्याचे प्रमुख रवी सिन्हा यांचा कार्यकाळ येत्या ३० जूनला संपत आहे. त्यानंतर १ जुलैपासून पराग जैन हे 'रॉ'चे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारतील.

# ११ वी प्रवेशाची पहिली यादी जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अकरावीच्या विद्यार्थ्यांना उत्सुकता लागलेल्या ११ वी प्रवेशाची यादी दोन दिवसांआधीच जाहीर झाली आहे. विशेष म्हणजे ११ वी प्रवेशाची पहिली यादी ३० जूनला जाहीर होणार होती, पण पहिली गुणवत्ता यादी आजच शिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे. जवळपास मागील दीड महिन्यापासून दहावी उत्तीर्ण विद्यार्थी अकरावी प्रवेशाची वाट पाहत होते. राज्यातील १२ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांनी यंदा अकरावीत कॉलेजसाठी ऑनलाइन प्रवेशासाठी नोंदणी केली आहे. दरम्यान, विद्यार्थी व पालकांना https://mahafyjcadmissions.in या वेबसाईटवर प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी पाहता येणार आहे.

सरकारने जाहीर केलेल्या यादीनुसार ३० जून ते ७ जुलै दरम्यानच्या कालावधीत पहिल्या गुणवत्ता यादीमध्ये कॉलेज मिळालेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये जाऊन आपला प्रवेश निश्चित करायचा आहे. संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करुन पारदर्शक व निकोप पध्दतीने प्रवेश प्रक्रिया होण्यासाठी पहिली गुणवत्ता यादी आता ३० जून रोजी जाहीर होणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, आजच यादी जाहीर झाली असून १ ते ७ जुलै दरम्यान मिळालेल्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठीचा वेळ दिला आहे. दहावी बोर्ड परीक्षा निकाल जाहीर होऊन दीड महिना झाला अजूनही प्रवेशाच्या प्रतीक्षेत १२ लाख ७१ हजार विद्यार्थी आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांनी https://mahafyjcadmissions.in या वेबसाईटवर जाऊन आपली गुणवत्ता यादी पाहून प्रवेशाचा निर्णय घ्यावा

राज्याच्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाला. निकाल जाहीर होऊन जवळपास आता दीड महिना होत आलाय. मात्र, अजूनही दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा अकरावीमध्ये प्रवेश झालेला नाही.


## पथक आजच सातारा जिल्ह्याकडे रवाना

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

# पालखी मार्गासह पंढरपूर शहरातील शौचालय सुविधांवर निरीक्षण ठेवणार एक विशेष पथक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमाका पंढरपूर : आषाढी यात्रा शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै रोजी संपन्न होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज तसेच अन्य संतांच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक पायी चालत येतात, या वारकरी भाविकांना पालखी मार्गावर पालखीतळांवर तसेच पंढरपूर शहरात यात्रा काळात शौचालय सुविधांचा वापर वारकऱ्यांना चांगल्या प्रकारे करता यावा, यासाठी सर्व शौचालय सुविधांच्या ठिकाणच्या गैरसोयी दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी एका विशेष पथकाची नियुक्ती केली आहे. त्यामुळे सर्व शौचालयांचा भाविकांना पूर्णपणे वापर करण्यास मदत होणार आहे.



आषाढी यात्रा काळात सार्वजनिक स्वच्छता राखली जावी, वारकऱ्यांना शौचालयाची व्यवस्था व्हावी यासाठी शासनाने पालखी मार्गावर जागोजागी मोबाईल टॉयलेट्स, कायम स्वरूपी टॉयलेट्स उभी केलेली आहेत.

विशेषता पालखी मार्गावर तसेच पालखीतळांवर भाविकांना मुबलक सुलभ शौचालयाची उपलब्धता व्हावी. तसेच शौचालया कडे जाणारे मार्ग सुस्थितीत असावेत यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विशेष पथकांची नियुक्ती केली आहे.

या पथकात उपजिल्हाधिकारी अमोल भोसले हे पथक प्रमुख असून, त्यांच्या अधिपत्याखाली जिल्हा परिषद व पोलीस प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी राहणार आहेत.

पायी पालखी सोहळ्यासोबत चालत येणाऱ्या वारकरी भाविकांना पुणे तसेच सातारा येथे सुलभ शौचालयबाबत काही अडचणी निर्माण झाल्या होत्या त्या अडचणी पालखी सोहळे सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर निर्माण होऊ नयेत. यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली असून. पालखी सोहळे मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचण्या अगोदरच सुलभ शौचालयाबाबतची सर्व सुविधा उपलब्ध राहणार आहे.

सदर पथकाचे प्रमुख व अधिकारी कर्मचारी आजच सातारा जिल्ह्याकडे रवाना झाले आहे .जेणेकरून पालखीसोहळे सोलापूर जिल्ह्यात दाखल झाल्यानंतर वारकरी भाविकांना याबाबत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

# ड्रोन कॅमेरामॅन प्रविण वाघमारे यानी टिपले संत तुकोबाराया पालखी सोहळ्याचे मनमोहक चित्र



वागदरी /एस.के. गायकवाड : भेटी लागे जीवा,मुखी हरी नाम घ्याव, पाऊले चालती पंढरीची वाट,विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल असे नामस्मरण करित पंढरपूर येथील विठ्ठलाच्या भेटी साठी पुणे येथून निघालेल्य संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यचे मनमोहक चित्रीकरण हडपसर पुणे येथे सध्या वास्तव्यास असलेले वागदरी ता.तुळजापूर येथिल सुपूत्र प्रविण श्रीरंग वाघमारे यानी केले असून ते भाविक भक्तासाठी आणि जनतेसाठी लक्षवेधी ठरले आहे.

वागदरी ता.तुळजापूर येथिल प्रविण वाघमारे हे कामानिमित्ताने आपल्या कुटूंबासह हडपसर पुणे येथे राहतात.त्याना फोटो चित्रीकरणाचा छंद जडला या छंदाचे रूपांतर व्यवसायात होऊन त्यानी फोटो स्टूडीओचा व्यवसाय सुरू केला. छोट्या मोठ्या चित्रपटाच्या चित्रिकरणाचे व प्रसंगी दिगदर्शनाचे काम ही ते करतात.ड्रोन कॅमेराद्वारे चित्रीकरण करण्याचा त्यांचा मोठा हातखंड आहे. ड्रोन केमेराद्वारे ते उत्कृष्ठ व्हिडीयो सुटिंग आणि फोटो काढतात.

प्रति वर्षा प्रमाणे आषाढी वारी निमित्ताने देहूगाव पुणे येथून निघणाऱ्या श्री संत जगदगुरु तुकाराम महाराजांच्या पालखी मध्ये ते मनोभावे सहभागी होऊन वरवंटच्या दिशेने पंढरपूरकडे मार्गस्थ होणारी संत तुकोबारायाची पालखी चौफुला चौकात विसावली असता प्रविण वाघमारे यानी ड्रोन कॅमेराद्वारे केलेले पालखीचे मनमोहक चित्रीकरण लक्षवेधी ठरले असून त्यानी केलेल्या या चित्रीकरणा बदल वागदरी ग्रामस्थातून व मित्र परिवारातून समाधान व्यक्त केले जात आहे.

# सक्षम समीक्षा नाटककार प्रेमानंद गजवी




## साहित्य विशेषांक रूढी संस्कृतीच् शवविच्छेदन करणारा प्रेमानंद गजवी भारतीय रंगभूमीवरील पहिला विद्रोही नाटककार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवी विकासाच्या प्रवासात भीती , क्रौर्य दारिद्र्य याबरोबर मानवाचा लढा सततच चालू राहिलेला आहे हे लढत असतानाच मानवाने गुलामीच्या शोषणाच्या बेड्या तोडण्याचे सर्व शतकातील प्रयत्न निरंतर केले आहेत ते चालूच राहणार आहेत पण त्यातील विद्रोह व बंड नकार हा सतत कलेच्या संस्कृतीच्या नावाखाली दडपणारी इथली अदम संस्कृती हा एक मोठा गहन प्रश्न आहे ज्ञानासाठी कला आनंदासाठी कला जीवनासाठी कला यापुढे आता कलेचा प्रवास फसवण्यासाठी कला आभासासाठी कला असा होण्याच्या कालखंडात भारतीय ज्ञान क्षेत्रात जो अनेक कलाक्षेत्रात प्रवास विविध भाषिकांचा झालेला आहे त्यामध्ये मराठी भाषिकांच्या साहित्य व्यवहारातीलनाटक या वांग्मय प्रकाराच्या विकासाचे स्वातंत्र्योत्तर काळातील प्रवास रेखाटन ही गोष्ट आनंद दायी आहेच पण विद्रोहाचा विकसित प्रवास हा नाट्य क्षेत्रात पुढे होत गेला नाही ज्यांनी तो पुढे नेहला. त्यातील जे इतिहास नाटककार ठरतात .त्यात डॉ भा शि शिंदे ,दत्ता भगत आणि प्रेमानंद गजवी यांना इतिहास श्रेष्ठ नाटककार म्हणून मान्यता देऊन आधी मान्यता देवून प्रायोगिक मराठी नाटककार व प्रेक्षक भाषिकांना आपली ज्ञान क्षेत्रातील उदारता व कलाक्षेत्राचा नित्य नवा स्वीकार करावा लागणार आहे .

पाश्चात्य नाटककार बेखत्त च्या प्रायोगिक रंगभूमीच्या सादरीकरणाचा स्वीकार करणारे मराठी नाटककार यांनी राजकीय विचार स्वीकारले नाहीत हे गोपू देशपांडे यांचे विधान येथील नव्याने नमूद करून असे म्हणावे लागते की दलित रंगभूमीवरील स्थित्यंतरे प्रायोगिक रंगभूमीवर दलित इतर नाटक करांनी समजावून घेतली नाहीत त्याला मान्यता दिली नाही ती स्वीकारली नाहीत तो नाटक या एकूण रंगभूमीच्या प्रवाहातील एक सशक्त प्रवाह होत चालला आहे अशी उदारता ही ऐंशी उत्तर च्या कालखंडात तब्बल चार दशके अद्याप ही वृत्ती दाखवलेली नाही परंतु कलेसाठी ज्ञान आणि ज्ञानासाठी कला विद्रोहासाठी कला मानव मुक्तीसाठी प्रबोधनासाठी कला हे हेतू बाळगून एकूण इथल्या शोषण व जात व्यवस्थेचे शव विच्छेदन करणारे प्रेमानंद गजवी या नाटक काराचे मराठी भाषेतील स्थान पुन्हा पुन्हा समीक्षा करून मांडण्याची गरज आहे तरच कला प्रकारात सुद्धा संकीर्ण वाद येत असलेल्या कालखंडात ही समीक्षा कानी कपाळी ओरडून ती रुजवावी लागणार आहे या हेतूने सक्षम समीक्षेचे संपादक शैलेश विश्वनाथ त्रिभुवन यांनी ऑक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर २४ चा नुकताच प्रकाशित केलेला नाटकर प्रेमानंद गजवी साहित्य विशेषांक हा वाचकांनी वाचणे हा एक मोठा आनंद आहे त्याचा परिचय करून देणे हे सुद्धा कलेतील ज्ञान व ज्ञानातील कला आणि त्यातील अभिजातता व विद्रोहाचा निरंतर विकास हा कसा होत चालला आहे ?हे दाखवण्यासाठी चा हा प्रस्तुत परीक्षण लेख आहे.

संपादक शैलेश त्रिभुवन यांनी गजवी यांची घेतलेली मुलाखत १५ जून १९४७ चा गजवी यांचा जन्म आजवर आयुष्याचा झालेला ७८ वर्षाचा प्रवास आणि त्यात अगोदर मनाला प्रश्न नसतात मलाही नव्हते पण प्रश्न पडतो फाटलेली श्रीमंती आणि विड्याच्या कारखान्यात पान पोहोचवण्याची काम करणारी आई आणि वडील यांच्या आठवणी सांगणारे गजवी हे बालपणाचा अनुबंध विसरलेले नाहीत .हे मुलाखतीतून स्पष्ट होते .गजवी यांनी १४ नाटके लिहिली. देव नवरी, वांझमाती तनमाजोरी जय जय रघुवीर समर्थ किरवंत पांढरा बुधवार गांधी आंबेडकर रंग यात्री नूर मोहम्मद साठे शुद्ध बीजापोटी व्याकरण अभिजात जंतू छावणी या नाटकांच्या निर्मितीची कारणे नाटक करांच्या कडून वदवून घेणारे त्रिभुवन यांना धन्यवाद द्यायला हवे. एकूणच संपादकाचे वैशिष्ट्य क्षमतेच्या लेखकांकडून, म्हणजेच प्रेमानंद गजवी यांचे किरवंत नाटक एक दृष्टीक्षेप डॉक्टर रिता तोरणे गोवा प्रेमानंद गजवी यांच्या एकांकिकातील विद्रोह माहेश्वरी वीरसंग गावित अहिल्यानगर प्रेमानंद गजवी यांचे तनमजुरी डॉक्टर पवन मांडवकर कळंब तनमाझोरी व आंबेडकरी विचाराचा समृद्ध अज्ञ अविष्कार यावर डॉक्टर संजय कांबळे बेळगाव प्रेमानंद गजवी यांचे नाटक व्याकरण अधिवास शास्त्रीय समीक्षा डॉक्टर फुला बागुल घोटभर पाण्याची वेदना मांडणारा पाणीदार माणूस माधव कौतिक कदम नंदुरबार गहाण एक शोकांतिका डॉक्टर अलका शिंदे पवार कल्याण प्रेमानंद गजवी मराठी रंगभूमीवरील दलित जीवनाची संघर्षमय गाथा संतोष बलभीम लंकेश्वर प्रेमानंद गजवी यांच्या एकांकिका संस्कृती संघर्ष अशोक हंडोरे प्रेमानंद गजवी यांच्या नाटकांनी एकांकिकातील मितकसृष्टी तुकाराम रोंगटे पुणे.,

बोधी कला संस्कृती अवधूत परळकर प्रेमांडगंजवी यांच्या एकांकिकेतील स्त्री प्रतिमा विठ्ठल शिंदे रंग यात्री प्रेमानंद गजवी यांच्या तरुण उत्तुंग प्रतिभेची कलात्मक व सर्जनशील यात्रा सतीश पावडे व्याकरण एक चिंतन मुकुंद मधुकर कुलकर्णी तनमजुरी प्रेमानंद गजवी यांचे कालातीत नाटक विवेक कमलाकर खरे गांधी आंबेडकर स्नेहा देऊसकर मराठी नाट्यसृष्टीला बळकट करणारा नाटककार प्रेमानंद गजवी डॉक्टर रवींद्र सत्यवान लोककला आणि प्रेमानंद गजवी यांचे एकांकिका डॉक्टर तारा भवाळकर आणि महत्त्वाचे म्हणजे भारतीय स्मशानभूमीवरील विद्रोह हा अत्यंत मौलिक उच्च दर्जाचा डॉक्टर महेंद्र भवरे मुंबई यांचा किरवंत नाटकाची सूक्ष्म समीक्षा करणारा व्यापक व प्रभावी लेख यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहेत.रंग निरंक ज्ञानात्मक साहित्य निर्मितीचा प्रवास हा डॉक्टर रमेश वरखेडे काही लेख अत्यंत वाचनीय आणि सक्षम समीक्षेच्या अंकाच्या उद्दिष्टाला न्याय देणारा लेख ठरला आहे. भवरे वर्खेडे यांचे दोन्ही लेख हे वाचणे हे सक्षम समीक्षा अंकाचे मौलिकता स्पष्ट करणारे कारण ठरेल आहे. इतकी या लेखांची सखोलता आशय घनता स्व मत नव विश्लेषण आणि समीक्षा या लेखकांनी केलेली आहे. या अंकात सर्वात महत्त्वाचे म्हणजे वाटा पळवाटा या गाजलेल्या नाटकाचे नाटककार दत्ता भगत मावळते नाट्य संमेलनाचे अध्यक्ष यांनी गजवी यांच्या बद्दल लिहिलेला लेख हा अतिशय उत्कृष्ट लेख असून गजवी यांचे व्यक्तिमत्व विद्रोह प्रायोगिक रंगभूमी विचारसरणी दलित चळवळ अस्पृश्यता शोषण आणि रुढीवादातील भय ग्रस्त वर्तन करणारा पिचलेला शोषित वंचित सर्वच जाती गटात अस्पृश्यता बाळगणारा पीडित माणूस हा रुढी आणि परंपरेचा बळी जा तो कसा? तोजगत राहतो. हे दाखवून देणारा मराठी भाषेतील सशक्त नाटककार असे भगत उत्तर कालखंडातील गज्वी

नाटककार असे गौरव उद्गार दत्ता भगत काढतात. एक नाटककार दुसऱ्या नाटककाराबद्दल इतक्या उदारपणे त्याची प्रतिभा त्याची सर्जन निर्मिती आणि त्याची विषय विविधता याबद्दल मनोमन प्रशंसा करतो .ही बाबत या लेखांमधील अत्यंत गौरवाची आणि आनंदाची ठरली आहे. हे सर्वच लेख वाचल्याशिवाय त्यातील सखोलता स्पष्ट होणार नाही विशेषतः

डॉक्टर अनिल सपकाळ यांनी गजवी यांच्या नाटकांचा चिकित्सक केलेला अभ्यास हा या लेखामध्ये स्पष्ट होतो. सपकाळ म्हणतात ,सामाजिक प्रबोधनातून परिवर्तन होत गेलेला नव मध्यम वर्ग क्रांती मूल्याची प्रतिष्ठापना करेल असे सामाजिक वातावरण भासमान होत होते. या चळवळीत परिवर्तने समकालीन नाटकांच्या मधून व्यक्त होत होती. तसा सामूहिक आविष्कार मराठी रंगभूमीवर प्रकट होत होता .ही सर्व स्थित्यंतरे गजवी यांच्या नाटकात दिसून येतात .किरवंत नाटकात ब्राह्मणाच्या वेदने विषयी गजवी बोलतात .वांझ मातीमध्ये ग्रामीण भागातील सत्ता करण व विषम जातीव्यवस्था स्पष्ट करून दाखवतात मांग आणि मराठा या जातींच्या मधील संघर्ष टोकदारपणे दाखवतात. जय जय रघुवीर समर्थ यामध्ये संप्रदाय आणि ब्राह्मण जाती विषयीच्या आत्मटिका गजनी कशी मांडणी करतात. हे सपकाळ यांनी दाखवून दिले आहे .एकूणच देवनवरी नाटकामध्ये स्त्री-पुरुषाच्या निवड स्वातंत्र्याचा व जात व्यवस्था रुढीग्रस्तता लैंगिक शोषणाला कशी मान्यता देते. हे दाखवून देणारे देव नवरी नाटक याबद्दल सूक्ष्म समीक्षा सपकाळ यांनी केली आहे .

अनिल सपकाळ यांनी १९८८ च्या अखिल भारतीय दलित नाट्य संमेलन च्या अध्यक्षपदावरून गजवींनी जी वेदना बोलून दाखवले आहे त्याचा उल्लेख या लेखात आहे स्वतः विषयी म्हणतात. गज्वी हे समाजवाद्यांनी नाटकात सोडून दिलेले लहान पिल्लू ,गजवी होय. छे छे तो तर कम्युनिस्टांच्या कळपातला.

नाही, हो तो युपी चा ब्राह्मण आहे .काहीच तरी काय? तुम्हाला ठाऊक नसेल ,तर बोलू नये, प्रायोगिक नाटकं लिहिणारा तो मुसलमान आहे .

मध्य प्रदेशचा

मी नक्की कोण दलित ,ब्राह्मण, मोची, मुसलमान युपीचा की मध्य प्रदेशचा?

माझी जात शोधण्याचा कोण हा आटापिटा

मी हाडा सच्चा मासाचा माणूस आहे हे त्यांना कधीच कसं जाणवलं नाही.?

माणसातला माणूस न शोधता त्याची जात ,प्रांत ,धर्म शोधणाऱ्यांना माणूस म्हणायचं? जनावर सुद्धा एका कुरणात मिळून मिसळून जगतात जे जनावरांना कळतं ते या माणसांना कळू नये?

जनावरांची सुद्धा लायकी नसलेल्यांना माणसं संबोधन त्या जनावरांचा अपमान करण्याची माझी मुळीच इच्छा नाही तर मित्रांनो माणसांच्या व्यथा आणि वेदनांना आपलेपणाच्या भावनेने शब्दरूप करणाऱ्या माझ्या लेखणीला या संमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान केला असावं अशी माझी नम्र भावना आहे.

हा गजवी यांच्या भाषणाचा भाग सपकाळ यांनी या लेखात नमूद केल्याने एकूण अस्वस्थ लेखक आणि वेदनेचा विद्रोह स्पष्ट होतो .

अत्यंत महत्त्वाचे म्हणजे प्रेमानंद गजवी यांच्या एकांकिका मधील विद्रोह माहेश्वरी गावित यांनी स्पष्ट करताना व्यापक आढावा घेतला आहे त्यामध्ये तुझी संस्कृतीच किडलेली आहे मुळापासून तुझा इतिहास मला देशद्रोही ठरवणार असल्यास तर खुशाल ठरव पण शेंडांची निर्मिती करण्याचा तो मोठा गोटा आहे षंढानोरे द्या फेकून तेजोखंड युगे युगे लादलेलं

एकूणच गजवी यांच्या नाटकांच्या मधील भवताल रूढी आणि शरना ता विद्रोह हे सर्व काही प्रायोगिक रंगभूमीच्या दर्जाच्या सादरीकरणासाठी त्यांनी वापरलेला फॉर्म त्यांनी तयार केलेले पात्रांचे अवकाश आणि त्यांच्या संवादातून संस्कृतीची केलेली चिरफाड ही मराठी रंगभूमीवर या नाटककाराच्या पहिल्या ऐतिहासिक प्रयत्नातून पुढे गेली आहे ,आणि यापूर्वी असे अनुस्फोट मराठी रंगभूमीवर दलित दुःखांचे नाटकामधून इतक्या तीव्रतेने व्यक्त झालेले नव्हते .नाहीत म्हणून गंजवी हे दलित नाटक विचारसरणीचे नाटक आंबेडकरी विचाराचे नाटक अस्पृश्यता विद्रोह अभिव्यक्त करणारे नाटक आणि संवेदना जागवणारे नाटक दलित मनाला शिका संघटित व्हा संघर्षाला सिद्ध राहा. असे सतत कथन करणारे नाटक खूप दृश्य साक्षरताच वाढवत नाही तर संवेदनेचा अंगार फुलवते हे ८० ते ९० च्या दशकात मराठी रंगभूमीवर झालेले आहे .मात्र ९० उत्तर जगातील बदललेला भांडवलशाही औद्योगिक विकासाचा वेगवान प्रवास हा संवेदना चीरडून पुढे निघाला आहे.

त्यामुळे प्रायोगिक रंगभूमीवरील गजवी यांच्या नाटकाचे सातत्यपूर्ण सादरीकरण जनमनाचे विद्रोहाचे वर्तन यातूनच घडू शकते. वाढू शकते, म्हणून रंगभूमीला या नाटककाराची गरज जोपर्यंत शोषण आणि अत्याचार आहे तोपर्यंत आहे.या सादरीकरणाची गरज राहणार आहे. हे देश पातळीवरील रंगभूमीचे ऐतिहासिक कार्य करणाऱ्या प्रेमानंद गजवी या नाटक कार्याला इथल्या संकीर्ण नाटक कारयाणी प्रायोगिक वाद्यांनी मुख्य प्रवाहातील नाटक म्हणून सातत्याने स्वीकारले नाही .हेही शल्य रंगभूमीच्या समीक्षणावरून दिसून येते ,पण तरीही भारतीय नाट्य परंपरा प्रवाह विकास यांच्यामध्ये दलित रंगभूमीचा हा इतिहास घडवणारा नाटककार म्हणून सक्षम समीक्षा या अंकातील सर्व लेखकांनी ज्या अभ्यासपूर्वक निरीक्षणे नोंदवले आहेत हेच या नाटकाचे यश आहे इतके सूक्ष्म समीक्षण मौलिक समीक्षण विधायक व सांस्कृतिक असे अभिव्यक्त करणारी ही समीक्षा सक्षम समीक्षा खूप या अंकाला उच्च दर्जा प्राप्त करून देते वाचन आनंद मिळवून देते. की नाटक कराचा दीर्घ प्रवास याचा ऐतिहासिक दस्तऐवज शैलेश त्रिभुवन यांनी मराठी भाषिकांना उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचे वाचन भरून रंगभूमीचा प्रेक्षक वाचक या नात्याने त्यांचे त्रिवार अभिनंदन करणे आवश्यक वाटते .

**– शिवाजी राऊत**
**सातारा**



# छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त विविध सेवा शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : साठेनगर,माणीकपेठ,अक्कलकोट येथे राजेश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त फकीरा दल व तथागत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने नागरिका अडचणी लक्षात घेऊन त्यांचा वेळ व पैसा वाचवण्यासाठी मोफत आयुष्यमान कार्ड, आभा कार्ड, ई-श्रम कार्ड, झिरो बॅलन्स बँक अकाउंट इत्यादी सेवा शिबिर संपन्न होऊन होऊन ताबडतोब कार्ड वाटप करण्यात आले. ही सेवा चालू राहील. कार्यक्रमाच्या सुरुवातीला फोटो पूजन करू शाहू महाराजांची महती सांगण्यात आली व मान्यवरांचे सन्मान करण्यात आला.



यावेळी मातंग समाज अध्यक्ष निवृत्ती पारखे सरपंच अनिल देडे भारतीय बौद्ध महासभा ता.अध्यक्ष साहिल कांबळे, आरपीआय शहर उपाध्यक्ष सुरेश सोनकांबळे, संजय पात्रे, न.प.मुकादम बालाजी पारखे, राहुल ढोबळे, बिराप्पा पुजारी, अंबादास शितोळे, हणमंत पात्रे, स्वामीनाथ कामनळ्ळी, सूर्यकांत लोखंडे, प्रकाश कामनळ्ळी विजय डांगे, अभिषेक शितोळे रेश्मा पारखे, काजल शिंगे, आरती पारखे आदि पदाधिकारी समाज बांधवासह भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयोजक ज्योतिबा पारखे यांनी तर आभार अंबादास शिंगे यांनी मानले.

# इंदापूरच्या आश्रमशाळेत पालखी सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : (दि.२८) : पंढरीच्या वारीची परंपरा ही आपली वारकरी संस्कृती आहे. यातून सामाजिक ऐक्य, सर्व धर्म समभाव ही विचारधारा विद्यार्थ्यांमध्ये रुजावी या उद्देशाने मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर संचलित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे आणि मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलाच्या प्रांगणात शालेय पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी शालेय वारकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसत होता. यात विद्यार्थी विविध संतांच्या,वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी झाले.विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई आदी संतांच्या वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकारल्या होत्या. या वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांनी लक्ष वेधले होते.विठ्ठल-विठ्ठल, ज्ञानोबा- माऊलीच्या गजरात विद्यार्थ्यांनी पालखीचा आनंद अनुभवला.

शिक्षक हिरालाल चंदनशिवे, नानासाहेब सानप यांनी वारी, दिंडीच्या परंपरेचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे(काकी), सचिव ड. समीर मखरे यांनी पालखीचे पारंपरिक पूजन केले.

विद्यार्थ्यांनी हाती भगव्या पताका फडकवित,टाळ मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा - माऊली तुकाराम असा नामघोष आणि पांडुरंगाचे नामस्मरण करीत प्रांगणात पालखी सोहळा पार पडताच,इंदापूर प्रमाणेच रिंगण करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांनी फुगड्या खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांच्या हातात भगवे झेंडे / पताका ,तर मुलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन बघून हे जणू पंढरपूरच्या वारीला निघाल्याचा भास होत होता. मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे यांच्या नियोजन आणि संकल्पनेतून शालेय विद्यार्थ्यांची दिंडी आषाढी एकादशी निमित्त उत्साहात संपन्न झाली.

# बापरे! शुभांशू शुक्ला यांचा अंतराळात २८ हजार किमी प्रतितास वेगाने प्रवास....

(पान १ वरून...) ठरतात. पण इथे मायक्रो ग्रॅविटी आहे. त्यामुळे छोट्या-छोट्या गोष्टीही कठीण होतात. मी आता तुमच्याशी बोलत आहे, तेव्हा मी माझ्या पायांना बांधून ठेवले आहे. नाहीतर मी वर उडून जाईन. मी जो माईक पकडला आहे, तो सोडला तर तो तरंगत राहील. पाणी पिणे, चालणे, झोपणे सगळे खूप कठीण आहे. वातावरण बदलते तेव्हा जुळवून घ्यायला एक-दोन दिवस लागतात.

'तिंरगा खूप भावुक करतो'

भारताची ताकद विज्ञान आणि अध्यात्म दोन्ही आहे. तुम्ही अंतराळ यात्रेवर आहात, पण तुमच्या आतमध्ये भारताची यात्रा सुरू असेल. त्या वातावरणात मेडिटेशन आणि माईंडफुलनेसचा फायदा होतो का? असा प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुभांशू शुक्ला यांना विचारलं. त्यावर सुभांशू यांनी सविस्तर उत्तर दिलं.

तुमच्याशी बोलताना मी माझे पाय बांधून ठेवले आहेत. कारण इथे झिरो ग्रॅविटी आहे. असे नाही केले तर मी उडायला लागेल. इथे झोपणे खूप मोठे चॅलेंज आहे. इथे माईंडफुलनेसचा खूप उपयोग होतो. कारण लॉन्चिंगच्या वेळी परिस्थिती खूप वेगळी असते. पण जेव्हा आपण आपले मन शांत ठेवतो, तेव्हा चांगले निर्णय घेऊ शकतो. अशा कठीण परिस्थितीत हे सगळे खूप फायद्याचे ठरते. ही यात्रा अद्भुत आहे. इथे पोहोचल्यानंतर मला वाटते की ही माझ्या देशासाठी खूप मोठे 'अचीव्हमेंट'आहे. मी देशातील मुलांना सांगेन की तुम्ही आपले भविष्य चांगले बनवा. कारण त्यामुळे फक्त मुलांचेच नाही, तर देशाचे भविष्यही उज्ज्वल होईल. नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवा की 'स्काय इज नेव्हर द लिमिट'. माझ्या मागे जो तुम्ही तिरंगा पाहत आहात, तो आधी नव्हता. तो मी इथे कालच लावला आहे. तो मला खूप भावुक करतो.

अंतराळात काय प्रयोग करणार?

तुम्ही अंतराळात अनेक प्रयोग करत आहात. असा कोणता प्रयोग आहे, जो भविष्यात शेती किंवा आरोग्य क्षेत्राला फायदा पोहोचवेल? असा प्रश्न नरेंद्र मोदी यांनी विचारला. त्यावर शुभांशू यांनी सांगितलं की, पहिल्यांदा भारतीय वैज्ञानिकांनी ७ युनिक म्हणजे खास एक्सपेरिमेंट डिझाइन केले आहेत. ते मी माझ्यासोबत स्पेस स्टेशनवर घेऊन आलो आहे. मी जो पहिला प्रयोग करणार आहे, तो स्टेम सेल्सवर आधारित आहे. अंतराळात आल्यावर ग्रॅविटी कमी होते. त्यामुळे मसल लॉस म्हणजे स्नायू कमजोर होतात. त्यावर मी प्रयोग करत आहे. काही सप्लीमेंट देऊन आपण मसल लॉस थांबवू शकतो का? किंवा त्याला उशीर लावू शकतो का? याचा थेट फायदा पृथ्वीवरही होईल. वृद्ध लोकांमध्ये मसल लॉस होतो, त्यांच्यावर हे सप्लीमेंट वापरले जाऊ शकतात.

शुभांशू यांचा भारतीय तरुणांना मोलाचा मेसेज

मिशन चांद्रयाननंतर विज्ञानाबद्दल एक नवीन आवड निर्माण झाली आहे. अंतराळ एक्सप्लोर करण्याची म्हणजे शोधण्याची इच्छा वाढली आहे. तुमची ऐतिहासिक यात्रा त्या संकल्पाला आणखी मजबूत करत आहे. आजकालची मुले फक्त आकाश बघत नाहीत, तर तिथे पोहोचण्याचा विचार करतात. तुम्ही भारताच्या युवा पिढीला काय संदेश द्याल? असा प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुभांशू यांना विचारला. त्यावर शुभांशू यांनी सांगितले, मी भारताच्या तरुणांना सांगू इच्छितो की भारताने खूप मोठी स्वप्ने पाहिली आहेत. ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आम्हाला तुमच्या सगळ्यांची गरज आहे. मला हे पण सांगायचे आहे की, ड्डीललर्शीी चा कोणताही शॉर्टकट नाही. एक सामान्य गोष्ट आहे, प्रयत्न करणे कधीही सोडू नका. जर तुम्ही ठरवले की ऱ्र्ळीश ीं नाही करायचे तर ड्डीललर्शीी नक्कीच मिळेल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्यावतीने आयोजित 'आरोग्यवारी' उपक्रम स्तुत्य- क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे

## 'आरोग्य वारी' उपक्रमाचे इंदापूर तालुक्यात निमगाव केतकी येथे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्यावतीने आयोजित 'आरोग्यवारी' उपक्रम स्तुत्य असल्याचे राज्याचे क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नमूद केले. महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी आयोगाच्यावतीने हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांना राज्य शासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

राज्य महिला आयोग आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथे आयोजित 'आरोग्य वारी' उपक्रमावेळी ते बोलत होते. यावेळी आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, सदस्य सचिव नंदिनी आवडे, उपसचिव डॉ. पद्मश्री बैनाडे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जामसिंग गिरासे, आरोग्य उपसंचालक प्रशांत वाडीकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, तहसीलदार जीवन बनसोडे, गट विकास अधिकारी सचिन खुडे आदी उपस्थित होते.

श्री. भरणे म्हणाले, आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या महिलांना त्रास होणार नाही, त्यांना चांगल्या प्रकारच्या आरोग्यविषयक सोई-सुविधा मिळाव्यात याकरीता हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वारकरी महिलांना सॅनिटरी नॅपकिन, बालकांना स्तनपानाकरिता हिरकणी कक्ष, न्हाणीघर, शौचालय, स्वच्छतागृह, दामिनीपथक, प्राथमिक उपचार, रुग्णवाहिका आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

**महिलांची सुरक्षा, सक्षमीकरण आणि सन्मानाकरिता राज्यशासन कार्यरत**

राज्य शासनाच्यावतीने महिलांसाठी आरोग्याविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. महिलांच्या प्रश्नाबाबत राज्य शासन जागरूक असून महिलांची सुरक्षा आणि सक्षमीकरणाकरिता काम करीत आहे. महिलांनी स्वावलंबी व्हावे, त्यांना रोजगार मिळावा याकरिता बचतगटाची चळवळ उभारण्यात आली आहे, बचतगटाच्या माध्यमातून तालुक्यातील महिलांना कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**महिलांना सन्मानाची वागणूक द्या**

आपल्यामुळे इतराला त्रास होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी, एकमेकाला प्रेम, आनंदाची, विचारांची देवाणघेवाण करण्यासोबतच महिलांना सन्मानाची वागणूक द्या. मनमोकळेपणाने संवाद साधावा. 'हुंडा घेणार किंवा देणार नाही' असे चांगले संकल्प करूया, असे आवाहन श्री. भरणे म्हणाले.

आज संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे आज इंदापुर तालुक्यात आगमन होत असून नागरिकांनी वारकऱ्यांची उत्तमपणे सेवा करुन तालुक्याचे नाव राज्यात उज्वल करण्याचे काम करुया, असे आवाहन श्री. भरणे यांनी केले.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या, संत जनाबाई, संत मुक्ताबाईंनी स्त्री मुक्तीची चळवळ वारीच्या माध्यमातून दिली. देहू, आळंदी, मुक्ताईनगर यांसह विविध भागातून वारकरी संप्रदायाची परंपरा जोपासत वारीत वारकरी सहभागी होतात. अशा या सहभागी महिलांच्या मासिक पाळीचा आदी आरोग्य आणि स्वच्छताविषयक बाबींचा विचार करुन महिला आयोग आणि पुणे, सातारा तसेच सोलापूर जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ४ वर्षापासून 'आरोग्य वारी' प्रशासनाच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाअंतर्गत तिन्ही जिल्ह्यात १९८ हिरकणी कक्ष, ३० हजार ९८८ शौचालय, ३ हजार ४५४ न्हाणीघर, २२३ वैद्यकीय पथक, ३१७ रुग्णवाहिका, १८९ आरोग्यदूत, २२६ स्थानिक उपचार केंद्र, १२ उपजिल्हा रुग्णालय आणि ४६६ उपकेंद्राचा समावेश आहे. तसेच महिलांना सॅनिटरी नॅपकिन, नॅपकिन बर्निंग इन्सिनरेशन आदी सुविधा प्रत्येक १० ते १२ किलोमीटर अंतरावर केल्या आहेत.

महिलांना सुरक्षिततेचा, प्रगतीचा विश्वास देण्यासाठी आयोग प्रयत्न करत आहे. स्त्रीभ्रूणहत्या, बालविवाह विरोधात आई म्हणून महिलांनी भूमिका बजावावी. हुंडाबळी, अंधश्रद्धा, विधवाप्रथा आदी प्रवृत्तीविरोधात सक्षमपणे उभे रहावे. सामाजिक चळवळ म्हणून महिलांना सन्मानाची वागणूक द्यावी. याकरिता अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका, आशा कार्यकर्त्या शासनाच्या योजना घराघरापर्यंत पोहचविण्याचे काम करीत असतात, वारीसोबतच विचारांची वारी प्रगतीकडे घेऊन जायची आहे. वारीच्या माध्यमातून आरोग्य विषयक जनजागृती करत आरोग्याची काळजी घेऊया. आपले तन आणि मन सक्षमपणे सदृढ करण्याकरिता एकत्रितपणे प्रयत्न करु या. महिलांची वारी भक्तिमय असण्यासोबतच आरोग्यमय करण्याचा संकल्प करुया, असे आवाहन श्रीमती चाकणकर यांनी केला.



महिलांना कोणाकडूनही त्रासाला, गुन्हेगारीला सामोरे जावे लागल्यास पोलिसांकडे तक्रार करावी. कौटुंबिक हिंसाचाराच्या अनुषंगाने 'भरोसा सेल' काम करते. समस्या न सुटल्यास आयोगाकडे संपर्क साधावा, आयोग आपल्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहील, अशी ग्वाही श्रीमती. चाकणकर यांनी दिली.

श्रीमती आवडे म्हणाल्या, राज्य महिला आयोग महिलांच्या हक्काचे संरक्षण करण्याकरिता कटिबद्ध आहे. राज्य शासनाच्यावतीने वारकऱ्यांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती आवडे यांनी केले.

इंदापूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष प्रदीप गारटकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या ड. रेश्मा गार्डे आणि रिटेनर लॉयर संजय चंदनशिवे यांनी महिलांकरिता असलेले कायदे, विधी सेवा प्राधिकरणाच्या सेवांबाबत माहिती दिली.

यावेळी श्री. भरणे यांच्या हस्ते आरोग्य उपक्रमाअंतर्गत हिरकणी कक्ष, औषधोपचार केंद्र, कर्करोग जनजागृती वाहनाचे उद्घाटन करण्यात आले, येथील सोई-सुविधांची माहिती जाणून घेतली.

यावेळी निर्माण संस्थेच्यावतीने 'हुंडा' विषयावर जनजागृतीपर पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, सरपंच प्रवीण डोंगरे, ग्रामविकास अधिकारी आबा जगताप आदी उपस्थित होते.

---

# गुलाबराव हाडशीकर यांचा जेष्ठ तमाशा कलावंत म्हणून बालगंधर्व रंगमंदिरात गौरव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड पुणे : बालगंधर्व रंगमंदिराच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे महापालिका व बालगंधर्व परिवार यांच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात, हाडशी तालुका मुळशी येथील तमाशा कलावंत गुलाबराव हाडशीकर यांना जेष्ठ तमाशा कलावंत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

बालगंधर्व रंगमंदीर पुणे येथे ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी जेष्ठ अभिनेत्री लिला गांधी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन तर जेष्ठ अभिनेत्री आशा खाडिलकर जेष्ठ तमाशा कलावंत गुलाबराव हाडशीकर जेष्ठ लावणी नृत्यांगना सुरेखा पुणेकर जेष्ठ कलावंत या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात गुलाबराव ओव्हाळ हाडशीकर यांना सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देशाई व मेघराज भोसले यांच्या शुभहस्ते जेष्ठ तमाशा कलावंत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, यावेळी विचारमंचावर बालगंधर्व रंगमंदीर परीवार गुलाबराव ओव्हाळ हाडशीकर परीवारातील सदस्य उपस्थित होते.

गुलाबराव ओव्हाळ हाडशीकर हे हाडशी तालुका मुळशी जिल्हा पुणे येथील कलावंत असून आपल्या वडीलापासून त्यांनी तमाशा कलावंत म्हणून वारसा घेतला आहे. उत्कृष्ट तमाशा कलावंत म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात ओळख असून उत्कृष्ट कलावंत म्हणून त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत, बालगंधर्व जेष्ठ तमाशा कलावंत म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

---

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती महोत्सव तळा तालुका येथे उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोरघर/माणगांव प्रतिनिधी : समता, बंधुता, न्याय यांची शिकवण देणारे, दीन दुबळ्यांचे तारणहार, थोर समाज सुधारक, आरक्षणाचे जनक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारताचे पुढारी संबोधणारे लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांचा १५१ वा जयंती महोत्सव दि.२६ जून २०२५ रोजी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांच्या संयुक्त विद्यमाने मु.तळा भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा संपर्क कार्यालय या ठिकाणी बौद्धजन पंचायत समिती तालुका तळा अध्यक्ष अनंत गोपाळ मोरे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



याप्रसंगी मानव आदर्शांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व सुत्रपठण संस्कार उपाध्यक्ष नरेश मोरे यांनी केले. शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा अध्यक्ष रामदास शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या, तद्नंतर बौध्दजन पंचायत समिती शाखा क्र.४ चे अध्यक्ष संदेश पवार, पल्लवीताई सकपाळ, भारतीय बौद्धमहासभा तळा संघटक सुरेंद्र शेलार यांनी शाहू महाराज यांच्या जीवनचरित्रावर प्रामुख्याने मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी भारतीय बौद्धमहासभा तळा तालुका माजी कार्यालयीन सचिव केशव लोखंडे यांनी आपल्या शैक्षणिक सेवेतील कार्यकाल पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने त्यांचा दोन्ही तालुका संस्थांच्यावतीने आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी तालुका सचिव गणपत जगताप,महिला अध्यक्षा सुषमा शिंदे, हरिश्चंद्र शिंदे, मधुकर नाक्ते, संरक्षण प्रमुख मनोहर शिंदे, महादेव जगताप, विठ्ठल जगताप, युवराज जाधव, यशवंत जाधव, सुधीर शिंदे, रवींद्र जगताप, अनिशा जगताप, विजया जगताप, सुमन सकपाळ, विशाखा शिंदे, बहुजन समाजातील अकबरभाई गोठेकर, त्याचप्रमणे समता सैनिक दलाचे जवान प्रथमेश शिंदे, सैनिक शिशुपाल गवाणे व सैनिक दिक्षा जगताप तसेच आदि मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते, या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुरेंद्र शेलार यांनी केले. याप्रसंगी सरणत्तय घेऊन व महापुरुषांच्या नावाचा जयघोष करून अध्यक्षीय भाषणाणे कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

## पिंपळस ते येवला रस्त्यावरील खड्ड्यांत माती टाकल्याने अपघातांचा धोका वाढला; नागरिक त्रस्त

# नामदार भुजबळांच्या आदेशाला ठेकेदारांची मातीची टोपली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पिंपळस ते येवला रस्त्यावर सध्या काँक्रीटीकरणाचे काम प्रगतीपथावर असताना, या मार्गावर वाहतुकीची एक बाजू खुली ठेवून काम सुरु आहे. काही दिवसांपूर्वी या कामाची पाहणी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री नामदार छगन भुजबळ यांनी केली होती. त्यावेळी त्यांनी संबंधित ठेकेदारांना आदेश दिले होते की, वाहतुकीसाठी खुल्या ठेवलेल्या मार्गावर असलेले खड्डे तात्पुरते का होईना पण बुजवण्यात यावेत, जेणेकरून प्रवाशांना आणि वाहनचालकांना त्रास होणार नाही.मात्र, ठेकेदारांनी या आदेशाची अंमलबजावणी करताना हलगर्जीपणा केल्याचे समोर आले आहे.



खड्डे बुजवण्यासाठी आवश्यक असलेल्या डांबर-खडी किंवा योग्य रस्ते साहित्याचा वापर न करता सरळ माती टाकून खड्डे बुजवले गेले आहेत. परिणामी, पावसाळ्यात ही माती निसटून चिखलात रूपांतरित होत आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकी, चारचाकी वाहनचालकांना मोठ्या अपघाताचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी वाहन घसरून पडल्याच्या घटना घडल्या असून काही ठिकाणी नागरिक किरकोळ जखमीही झाले आहेत. चिखल साचल्यामुळे रस्त्यांवरून चालणे देखील कठीण झाले आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या वेळी शालेय विद्यार्थ्यांसह नोकरीनिमित्त बाहेर पडणाऱ्या नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. धूळ आणि माती उडाल्याने अनेकांना डोळ्यांमध्ये आग होणे, खवखव, आणि इतर आरोग्यविषयक तक्रारी निर्माण होत आहेत. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, महिलांना विशेषतः या असुरक्षित रस्त्यांमुळे धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत अनेक वेळा ग्रामपंचायतीपासून ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या, परंतु अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. ठेकेदारांचे मनमानी व प्रशासनाची उदासीनता यामुळे नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर ठेकेदारांवर योग्य कारवाई करून, खड्डे योग्य साहित्य वापरून बुजवण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. पावसाळा सुरु झालेला असताना, तातडीने योग्य रस्ते डागडुजी न केल्यास भविष्यात मोठ्या अपघातांचे संकट उभे राहू शकते. प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी याची गंभीर दखल घेऊन त्वरित उपाययोजना करावी, हीच जनतेची अपेक्षा आहे.

---

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत -अनुदान, बिजभांडवल योजना व थेट कर्ज योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत मांग,मातंग,मिनी-मादींग, मादींग,दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील लोकांची आर्थिक उन्नती होण्यासाठी महामंडळामार्फत अनुदान योजना व बीजभांडवल योजना राबविण्यात येतात, सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) सोलापूर जिल्हयाकरिता अनुदान योजना- भौतिक उद्दिष्ट ७५ यामध्ये आर्थिक उद्दिष्ट रक्कम रु.३६.५० लाख व बीजभांडवल योजने अंतर्गत भौतिक उद्दिष्ट ७५ यामध्ये आर्थिक उद्दिष्ट रु.५२५.०० लाख प्राप्त झाले आहे.

महामंडळाचे दि. १७ जून २०२५ च्या पात्राअन्वये २० कलमी कार्यक्रम २००६ कलम १० (३४) अनुसार महामंडळामार्फत राबविण्यात येत आसलेल्या अनुदान योजना, बिजभांडवल योजना तसेच थेट कर्ज योजनाअंतर्गत मांतग समाज व तत्सम १२ पोटजातीतील लोकांना आर्थिक लाभ देण्याकामी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाकरिता महामंडळाने निश्चित केलेल्या जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक उदिष्ट प्राप्त झाले आहे. करिता जिल्हा कार्यालय सोलापूर मार्फत अनुदान योजना, बिजभांडवल योजना तसेच थेट कर्ज योजना या योजनांमध्ये कर्ज मागणी अर्ज वितरण करणे व अर्ज स्विकारण्याचे काम सुरु करण्यात आली आहे.

तरी वर उल्लेख केलेल्या जातीतील इच्छुक, गरजु व होतकरुनी महामंडळाचे जिल्हा कार्यालय, २ रा माळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता, शासकीय विश्रामगृहाच्या पाठीमागे, बीग बजार समोर. सोलापूर येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा असे, आवाहन जिल्हा व्यवस्थापक, सोलापूर आर. एच. चव्हाण, यांनी केले आहे.

# भाजपा आमदार बबनराव लोणीकराच्या वक्तव्याच्या निषेधार्थ मनसे-शिवसेना आक्रमक होऊन रस्त्यावर एकत्र

## दोन्ही ठाकरेंच्या समर्थकांची एकच भूमिका, बबनराव लोणीकराचा तात्काळ राजीनामा घ्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात राष्ट्रीय महामार्गांवर शिवसेना (ठाकरे गट) व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने भाजपाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ मोर्चा काढून प्रतिमेस जोडे मारो आंदोलन केले,यावेळी भाजपाने व सरकारने अशा मुजोर व बेताल वक्तव्य करणाऱ्या आमदाराचा तात्काळ राजीनामा घ्यावा अशी भूमिका दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेतली,मोर्चाला माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, मनसेचे जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे, ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख जितेंद्र कानडे, कृष्णात मोरे, मनसेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी, शिवसेनेचे शहरप्रमुख संतोष पुदाले, जगन्नाथ गवळी, युवासेनेचे उप.संघटक दिपक बंडगर, सोशल मीडिया प्रमुख चेतन बंडगर, आमेर शेख आदींनी संबोधित करत बबनराव लोणीकराचा समाचार घेतला, शिवसैनिक व महाराष्ट्र सैनिकांनी अशा मुजोर आमदारास पाठीशी घालणाऱ्या सत्ताधाऱ्या



विरोधात घोषणाबाजी केली.

यावेळी शिवसेनेचे बाळकृष्ण घोडके, सरदारसिंग ठाकूर, शाम माळी, मनसेचे शहराध्यक्ष अलिम शेख, गणेश बिराजदार, शिरीष डुकरे, सोमेश्वर आलूरे, अमोल रुपणर, किरण बिराजदार, प्रशांत गरड, राम माने, राजपूत शिवसेनेचे मेजर जाधव, बबन जोशी, दत्ता भोसले, शाम कणकधर, नेताजी महाबोले, सोमनाथ म्हेत्रे, दिनेश बंडगर, छोटू घुगे, चंदर सगरे यांच्यासह शिवसैनिक व महाराष्ट्र सैनिक व शेतकरी-नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी शेतकरी संघर्ष समिती-नेही वक्तव्याचा निषेध करत आंदोलनात सहभागी झाले होते.



# सयाजी राजे वॉटर पार्क पाळणा अपघात मृत्यू पावलेले तुषार धुमाळ यांच्या नातेवाईकांची जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांच्याकडे धाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अकलूज तालुका माळशिरस येथील मोहिते पाटील यांच्या सयाजी राजे वॉटर पार्क मधील ऑक्टोपसराईड मधील पाळणा तुटून अपघातात मृत्यू पावलेली स्वर्गीय तुषार शशिकांत धुमाळ यांची नातेवाईक श्री विशाल रामचंद्र धुमाळ व अक्षय राजेंद्र धुमाळ यांची अकलूज पोलीस स्टेशन येथील गुन्हा रजिस्टर नंबर ४४ ५/२०२५ मध्ये वाढीव कलम लावून सर्व आरोपींना अटक होत नसल्याने सहकुटुंब अमरण उपोषण करणार असल्याचे इशारा देणारे सोलापूर जिल्हाधिकारी कुंभार आशीर्वाद व सोलापूर पोलीस अधीक्षक श्री शरद देशपांडे यांना निवेदन दिलेली आहे.

सदरच्या निवेदनात दिनांक १८/०६/२०२५ रोजी आहे चुलत भाऊ तुषार शशिकांत धुमाळ हा त्याची कामानिमित्त अकलूज येथे गेलेला होता तेथे गेल्यावर त्यांचे मित्र यांचे संभाषण झाल्यावर ते वाटर पार्क अकलूज येथील सयाजी राजे वॉटर पार्क या ठिकाणी फिरण्यासाठी गेले होते व तिथे गेल्यावर ऑक्टोपार राईट मध्ये त्यांचा चुलत भाऊ बसलेला होता त्याच बरोबर त्यांच्या मित्र वैभव आई होता तिथे आमच्या गावातील धनाजी मल्हारी बंडगर राधान मदनवाडी तसेच इतर त्यांचे इन्शुरन्स कंपनीची लोक फिरण्यासाठी गेलेली होती हे दुसऱ्या पाण्यामध्ये बसलेली होती.

असे असताना सदर ऑक्टोबर राईट ची देखभाल व दुरुस्ती वेळेमध्ये न करता त्यामध्ये ब्ल्यू अपघात होण्याचे दाट शक्यता असतानाही त्याबरोबर कोणतीही योग्य ती कायदेशीर पूर्तता न करता सदर ऑक्टोबर राईट चालवली जात होती व यामध्ये अपघात होऊन एखाद्याचा जीव जाऊ शकतो त्याची पूर्ण कल्पना असताना सदर ठिकाणच्या ऑपरेटर व्यवस्थापक व मुख्य व्यवस्थापक व मालक यांनी त्याच्या कर्तव्यामध्ये कसूर करून सदर ठिकाणी अपघात घडून एखाद्या व्यक्तीच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो हे माहीत असतानाही त्यांनी व्यवस्थित देखभाल व दुरुस्ती केलेली नसल्यामुळे सदर ऑक्टोबर राईटच्या एक पाळणा त्यामध्ये माझा चुलत भाऊ व त्यांचे मित्र बसलेले होते तो तुटून खाली जमिनीवर आदळला व त्यामध्ये बसलेले माझा चुलत भाऊ डोक्यावर व मानेवर पडून त्याला गंभीर इजा होऊन त्यामध्ये तो मृत्युमुखी पडलेला आहे तसेच त्याच्याबरोबर असलेले कुठले यांच्यासोबत असलेले वैभव रुपनवर आई गंभीर जखमी झालेला आहे असे निवेदन मयत तुषार शशिकांत धुमाळ यांच्या नातेवाईकांनी आठ दिवसात च्या अल्टिमेटल्स देऊन संपूर्ण कुटुंब उपोषणाला उपोषण करणार असल्याच्या इशारा दिलेला आहे.

सदर निवेदनाचे प्रती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मुंबई देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तथा पालकमंत्री पुणे जिल्हा अजित दादा पवार ग्रामविकास व पंचायत राज्यमंत्री तथा पालकमंत्री सोलापूर जिल्हा जयकुमार गोरे पर्यटन मंत्री साहेब महाराष्ट्र राज्य उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब उपस्थित भाई अकलूज तालुका माळशिरस तहसीलदार साहेब तहसील कार्यालय माळशिरस तालुका माळशिरस सहाय्यक पोलीस अधीक्षक साहेब अकलूज पोलीस स्टेशन अकलूज तालुका माळशिरस यांच्या देण्यात आले आहेत.

# उद्या सोलापुरात विद्यार्थी करिअर मेळावा अन् गुणवंतांचा सन्मान







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनीधी : युवती सेना आणि युवा सेनेच्या वतीने सोमवारी ३० जून २०२५ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे करियर मार्गदर्शन मेळावा आणि गुणवंत विद्यार्थी सन्मान समारंभ कार्यक्रमाचे युवतीसेना व युवासेना च्या वतीने आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रमुख इंजि प्रियांका परांडे यांनी दिली आहे.

### युवा आणि युवती सेनेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

हा कार्यक्रम सोमवारी दुपारी १२ ते सायं ६. वाजेपर्यंत अचीवर्स हॉल, पोलिस हेड क्वार्टर च्या समोर,सिविल चौक,सोलापूर याठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात 'पोरा अजून थोड लढून बघ' या विषयावर प्रा.विक्रमसिंह मगर, यांचे व्याख्यान होईल. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील बोर्डेज अकॅडमीचे प्रा. संतोष बोर्डेज यांचेही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.

वरील कार्यक्रमासाठी [illegible] म्हेत्रे, युवा सेनेचे सचिव किरण साळवी हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार आहेत. तर माजी आमदार ॲड शहाजीबापू पाटील, प्रा.शिवाजीराव सावंत सर, महेशनांना साठे, संजयबाबा कोकाटे, अनिताताई माळगे, सागरदादा पाटील, महेश चिवटे, अमर पाटील, अमोल शिंदे, चरणराज चवरे मनीष काळजे , [illegible] पाटील, सुजित खुर्द, शितलताई म्हेत्रे, प्रियदर्शन साठी ,बालाजी बागल, गणेश जाधव ,महादेव भोसले, अभय देशमुख. आदी शिवसेनेचे सोलापूर जिल्ह्यातील विविध विभागाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी सर्वांनी उपास्थित राहावे असे आवाहन युवा सैनिक समी मौली यांनी केले आहे.

# अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर येथे छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर/प्रतिनिधी : आरक्षणाचे जनक,थोर समाजसुधारक,सामाजिक समता स्थापित करण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातलेले अद्वितीय व्यक्तीमत्व, लोककल्याणकारी राजा म्हणून ओळखले जाणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.याचाच एक भाग म्हणून महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते छ. शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रशालेच्या विद्यार्थिनी कु. शिवानी बाळशंकर व कु. वैदेही पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर क्रीडा व योग प्रशिक्षक श्री. शहाजी माने यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग सहाय्यिका सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांनी केले तर आभार सौ. मल्लम्मा चप्पळगाव मॅडम यांनी मानले. यावेळी पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.अप्पासाहेब काळे,छायाचित्र व प्रसिद्धी विभाग प्रमुख श्री. धनंजय जोजन, ज्युनियर विभाग प्रमुख प्रा. रविंद्र कालीबत्ते,सेमी विभाग प्रमुख श्री. शशिकांत अंकलगे, प्रवेश, क्षेत्र भेट व सहल विभाग प्रमुख सौ. मृदुलादेवी स्वामी, समस्त शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.





# ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांना स्नान

नीरामधील दत्तघाटावर श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांना स्नान घालण्यात आले. आज हा वैष्णवांचा मेळा सातारा जिल्ह्यात दाखल झाला. त्यानंतर माऊलींचा पालखी सोहळा लोणंदकडे मार्गस्थ होऊन लोणंदच्या पालखी तळावर विसावला आहे.


# समाज कल्याण विभागाकडून राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन दि. २६ जून प्रतिवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून. साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून सकाळी ९.०० वाजता पार्क चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर गणेश निऱ्हाळी , मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. व मान्यवरांच्या हस्ते समता दिंडीस हिरवा झेंडा दाखवून समता दिंडीचे प्रस्थान करण्यात आले. समता दिंडीमध्ये मुकुंदनगर गायन पार्टी या कलापथकाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनपटावर आधारित पोवाडे व विविध गीते सादर करण्यात आली.

या वेळी , सामाजिक समता प्रस्थपित करण्याकरीता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी मोठे योगदान दिले असून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि एकात्मता हे भारतीय संविधानाचा गाभा असून ते प्रत्येक नागरिकाने आत्मसात करण्याचे आवाहन केले. राजर्षी छत्रपती शाहु महाराजांनी समाजात समता व सामाजिक न्यायाचे मुळ रुजवले असून त्यांच्या विचारांच्या प्रेरणेतूनच राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबवून आर्थिक व सामाजिक उन्नतीचे कार्य केल्याचे सांगितले. छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना वंदन करुन जिल्ह्यातील सर्व जनतेस सामाजिक न्याय दिनानिमित्त लोक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणे ही विभागाची बांधिलकी असून विभाग यासाठी नेहमीच अग्रेसर आहे ,असे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, श्रीमती सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सोलापूर रविंद्र कदम पाटील यांनी दिंडीच्या समारोपा प्रसंगी शुभेच्छा देताना राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधुन जिल्ह्यात समता दिंडीच्या माध्यमातून समतेचे विचार व लोक जागृती करण्याचे महत्वपुर्ण कार्य अभिवादन कार्यक्रमाव्दारे होत असल्याचे सांगितले.



या कार्यक्रमास कार्यालयातील सर्व कर्मचारी, शासकीय वसतिगृहाचे गृहपाल व विद्यार्थी, जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचे कर्मचारी व जिल्हयातील विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, अनुदानित वसतिगृहाचे कर्मचारी, विविध महामंडळाचे कर्मचारी, समतादूत व तालुका समन्वयक उपस्थित होते.

अशी माहिती सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी दिली.

### राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार मंत्र्यांची उपस्थिती

### सहकारी क्षेत्राला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण चर्चा

# ३० जून रोजी नवी दिल्ली येथे सहकार मंत्रालयाची मंथन बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत सरकारच्या सहकार मंत्रालयातर्फे ३० जून रोजी नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार मंत्र्यांची मंथन बैठक केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

सहकारी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या बैठकीत सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे सहकार मंत्री तसेच सहकार विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रमुख सचिव आणि सचिव सहभागी होणार आहेत.

या मंथन बैठकीचे मुख्य उद्दिष्ट सहकार मंत्रालयाच्या आतापर्यंतच्या उपक्रमांचा आणि योजनांचा सर्वंकष आढावा घेणे, प्रगतीचे मूल्यमापन करणे आणि राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांकडून अनुभव, उत्तम पद्धती आणि रचनात्मक सूचनांचे आदान-प्रदान सुनिश्चित करणे आहे. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या 'सहकारातून समृद्धी' या दृष्टिकोनाला सामूहिक प्रयत्नांद्वारे पुढे नेण्यासाठी ही बैठक समन्वयित रणनीती विकसित करण्यासाठी प्रयत्न करेल.

या बैठकीत ग्रामीण भागात सेवा वितरण सुधारण्यासाठी २ लाख नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषि कर्ज सोसायट्या (झउड), डेअरी आणि मत्स्य सहकारी समित्यांच्या स्थापनेवर चर्चा होईल. याशिवाय, खाद्य सुरक्षा बळकट करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे सशक्तीकरण करण्यासाठी 'विश्वातील सर्वात मोठी अन्न भंडारण योजना' यावर विचारविनिमय केला जाईल. 'सहकारातून सहकार' मोहीम आणि 'आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५' अंतर्गत राज्यांची प्रगती आणि सहभाग यावरही चर्चा होईल.

राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेड (छउएङ), राष्ट्रीय सहकारी ऑर्गेनिक्स लिमिटेड (छउजङ) आणि भारतीय बीज सहकारी समिति लिमिटेड (इइडडङ) या तीन नवीन बहु-राज्यीय राष्ट्रीय सहकारी संस्थांमधील राज्यांचा सहभाग तपासला जाईल. श्वेत क्रांति २.० अंतर्गत डेअरी क्षेत्रात सर्कुलर अर्थव्यवस्था आणि टिकाऊपणाला प्रोत्साहन देणे, तसेच आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत डाळी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांसाठी समर्थन किंमती यावरही चर्चा होईल. झउड आणि सहकारी समित्यांच्या रजिस्ट्रार (ठउड) कार्यालयांचे संगणकीकरण, राष्ट्रीय सहकारी डेटाबेस आणि त्याचा धोरण निर्मितीतील उपयोग यासारख्या डिजिटल परिवर्तनाच्या उपक्रमांचा आढावा घेतला जाईल.

याशिवाय, त्रिभुवन सहकारी युनिव्हर्सिटीच्या स्थापनेसह सहकारी क्षेत्रातील मानव संसाधन विकास, प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण यावरही चर्चा होईल. सहकारी बँकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने उचललेल्या पावलांचा आढावा घेतला जाईल, ज्यात सहकारी बँकांशी संबंधित समस्यांचे निराकरण, राज्य सहकारी बँका (डींउइी) आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी (ऊऊ-उइी) साझा सेवा इकाई (डडए) आणि शहरी सहकारी बँकांसाठी (णउइी) छत्रसंस्थेचे संचालन यांचा समावेश आहे.